Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

**संशोधक**
**प्रा. डॉ.गोकुल शामराव डामरे**
स्व.उत्तमराव देशमुख अध्यापक महाविद्यालय,शेगांव

## सारांश

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये अनेक संत जन्माला आले. विदर्भ हा वैशिष्टपूर्ण असा या महाराष्ट्राचाच एक भाग आहे. महाराष्ट्राला थोर महामानवांची, समाज सुधारकांची भक्कम परंपरा आहे. माणसाच्या उत्थानसाठी, त्याच्या विकासासाठी अनेकांनी आपली वाणी आणि लेखनी झिजविली आहे. अहोरात्र समाजाच्या कल्याणाचा विचार केला आहे. संतांचे साहित्य हे `जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती` यासारखे आहे. संत साहित्याची ही परंपरा चालविण्यास संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखामेळा आणि एकूणच संत मेळ्याचाही मोलाचा वाटा आहे. या नंतरच्या काळात अनेक समाजसुधारकांनी भारतामध्ये प्रबोधन चळवळ राबविली. त्यामध्ये राजा राम मोहन रॉय, लोकहितवादी, महात्मा गांधी, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्राधान्याने समावेश करावा लागेल. या तत्ववेत्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा चालविण्याचे काम महाराष्ट्र राज्यातील विदर्भ प्रदेशात जन्माला आलेल्या दोन आधुनिक संतांनी केले. ते संत म्हणजे वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यामधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाज सुधारणेसाठीच साहित्य निर्मिती केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तत्वज्ञान अभ्यासण्यासाठी त्यांच्या व्यक्तीमत्वाचा परीचय करून घेणे आवश्यक ठरते.

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी राष्ट्रवंदनेत केलेले दिसून येते.तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मुली, बालीका अजूनही अशिक्षित आढळतात. एक चांगली माता सांस्कृतिक शिक्षकापेक्षाही श्रेष्ठ असू शकते आणि जर ती शिक्षित असेल तर तिचा फायदा होऊ शकतो. अर्थार्जन करणारी ही वैचारिक स्वातंत्र खरचं अनुभवते आहे का? हाही एक प्रश्नच आहे.

## संशोधन निबंधाचे शीर्षक

नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

## संशोधन निबंधाचे उद्दिष्ट्ये

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारकार्याच्या विविध पैलूंचा शोध घेणे.

सध्याच्या परिस्थितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्वज्ञानातील मुल्यांची नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने उपयुक्तता अभ्यासणे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीकोनातुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्वज्ञानाचा चिकीत्सक अभ्यास करणे.

## संशोधन निबंध परिकल्पना :

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या तत्वज्ञानाचे प्रतिबिंब उमटल्यास शिक्षण क्षेत्रामध्ये सकारात्मक बदल घडून येतील.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संशोधन पध्दती निवड

प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षणात्मक व वर्णनात्मक आहे. म्हणून या संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात शिक्षकांची, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्यप्रचारकांची व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अभ्यासकांनी मते जाणून घेवून त्यांच्या दृष्टिकोनाचा शोध घ्यावयाचा आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

## न्यादर्श निवड :-

प्रस्तुत संशोधनात २० शाळांची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात करण्यात आली आहे. प्राथमिक स्तरावर काम करणारे 20 शिक्षक अभ्यासक यांची निवड करण्यात आली आहे.

## संशोधन साधनांची निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी शिक्षकांसाठी प्रश्नावली या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

## संशोधन निबंध निष्कर्ष

1. पालकाचे नेहमी समुपदेशन करून शिक्षणाचे महत्व त्यांना पटवून द्यावे जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल, असे तुकडोजी महाराजांचे मत होते.या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 45.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 46.% प्रतिसादक सहमत आहे, 7.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1% प्रतिसादक असहमत आहे आणि 1% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, पालकाचे नेहमी समुपदेशन करून शिक्षणाचे महत्व त्यांना पटवून द्यावे जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल असे आढळून येते.

2. मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांच्या कौशल्य व निर्मिती क्षमता या गोष्टीवर भर द्यावा असे तुकडोजी महाराजांनी सांगितले.या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 44.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 46.% प्रतिसादक सहमत आहे, 6.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1.% प्रतिसादक असहमत आहे आणि 3% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत.यावरून असा निष्कर्ष निघतो की, मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांच्या कौशल्य व निर्मिती क्षमता या गोष्टीवर भर द्यावा असे तुकडोजी महाराजांनी सांगितले असे आढळून येते.

3. विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकाचे ओझे कमी करून आवश्यक गरजेनुसार दर्जेदार पुस्तक निर्मिती करावी, असे तुकडोजी महाराजांनी सांगितले.या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 47.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 46.% प्रतिसादक सहमत आहे, 5.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1% प्रतिसादक असहमत आहे आणि 2% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकाचे ओझे कमी करून आवश्यक गरजेनुसार दर्जेदार पुस्तक निर्मिती करावी असे तुकडोजी महाराजांनी सांगितले असे आढळून येते.

4. शिक्षणापासून दूर असलेले आदिवासी, दिव्यांग, महिला यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तुकडोजी महाराजांनी प्रोत्साहन दिले. या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 47.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 44.% प्रतिसादक सहमत आहे, 6.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1% प्रतिसादक असहमत आहे आणि 2% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, शिक्षणापासून दूर असलेले आदिवासी, दिव्यांग, महिला यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तुकडोजी महाराजांनी प्रोत्साहन दिले असे आढळून येते.

5. कालबाह्य अभ्यासक्रमाला स्थान न देता, गरजेनुसार अभ्यासक्रम तयार करावा समाजाची गरज, उपयोगिता या गोष्टीला प्राधान्य देण्यात यावे असे तत्त्वज्ञान तुकडोजी महाराजांनी सांगितले. या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 43% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 47.% प्रतिसादक सहमत आहे, 7.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1%

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

प्रतिसादक असहमत आहे आणि 2% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, कालबाह्य अभ्यासक्रमाला स्थान न देता, गरजेनुसार अभ्यासक्रम तयार करावा समाजाची गरज, उपयोगिता या गोष्टीला प्राधान्य देण्यात यावे असे तत्त्वज्ञान तुकडोजी महाराजांनी सांगितले असे आढळून येते.

6. विषय निवडीसाठी विद्यार्थ्यांना लवचिकता ठेवावी. त्यासाठी गरजा, आवडी निवडी या गोष्टीचा विचार करावा असे तुकडोजी नेहमी सांगत असत. या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 43.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 47.% प्रतिसादक सहमत आहे, 7.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1% प्रतिसादक असहमत आहे आणि 2% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, विषय निवडीसाठी विद्यार्थ्यांना लवचिकता ठेवावी. त्यासाठी गरजा, आवडी निवडी या गोष्टीचा विचार करावा असे तुकडोजी नेहमी सांगत असत असे आढळून येते.

7. अनुभवात्मक शिक्षण व प्रात्यक्षिक शिक्षण यावर तुकडोजी महाराजांनी भर दिला.या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 43.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 46.% प्रतिसादक सहमत आहे, 7.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1.% प्रतिसादक असहमत आहे आणि 1.% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, अनुभवात्मक शिक्षण व प्रात्यक्षिक शिक्षण यावर तुकडोजी महाराजांनी भर दिला असे आढळून येते.

8. विद्यार्थ्याला प्राथमिक शिक्षण हे त्याच्या आवडी निवडी नुसार, उपक्रम आधारित, खेळावर आधारित दिले जावे असे तुकडोजी महाराज सांगतात. त्याचा प्रामुख्याने समावेश नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये झालेला दिसून येतो.या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 47.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 43.% प्रतिसादक सहमत आहे, 7.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1% प्रतिसादक असहमत आहे आणि 2% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्याला प्राथमिक शिक्षण हे त्याच्या आवडी निवडी नुसार, उपक्रम आधारित, खेळावर आधारित दिले जावे असे तुकडोजी महाराज सांगतात. त्याचा प्रामुख्याने समावेश नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये झालेला दिसून येतो असे आढळून येते.

9. पुस्तकी शिक्षणापेक्षा कृतिशील शिक्षणावर तुकडोजी महाराजांचा भर होता. या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 46.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 43.% प्रतिसादक सहमत आहे, 6.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1.% प्रतिसादक असहमत आहे आणि 4.% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, पुस्तकी शिक्षणापेक्षा कृतिशील शिक्षणावर तुकडोजी महाराजांचा भर होता असे आढळून येते.

10.प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिले जावे त्याचबरोबर बहुभाषिक तत्त्वाचा सुद्धा विचार करावा यावर तुकडोजी महाराजांचा भर होता त्याचा प्रामुख्याने समावेश नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये झालेला दिसून येतो. या प्रश्नाच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे आढळून येते की, 45.% प्रतिसादक पूर्णपणे सहमत आहेत, 44.% प्रतिसादक सहमत आहे, 7.% प्रतिसादक तटस्थ आहे, 1.% प्रतिसादक असहमत आहे आणि 3% प्रतिसादक पूर्णपणे असहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिले जावे. त्याचबरोबर बहुभाषिक तत्त्वाचा सुद्धा विचार करावा यावर तुकडोजी महाराजांचा भर होता त्याचा प्रामुख्याने समावेश नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये झालेला आहे असे आढळून येते.

## संशोधन निबंध शिफारशी

नविन शैक्षणिक धोरणात संशोधनावर जास्तीज जास्त भर देण्यात येणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्याला स्वतःच्या पायावर उभे करणे, त्याच्या आर्थिक विकासाला प्राधान्य देणे इ. कार्यक्रम करण्यात येणार आहे. प्रोत्साहन देण्यात यावे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

भविष्यकालीन शिक्षणव्यवस्थेसाठी मार्गदर्शक असलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की शिक्षण ही वाटण्याची भौतिक गोष्ट नव्हे तर मुले अनुभवातुन, कृतीतुन, वाचनातुन, व्यक्त होण्यातुन, चर्चा करण्यातुन प्रश्न विचारण्यातुन, ऐकण्यातून, विचारक करण्यातून, निरिक्षण करण्यातून विविध रितींनी शिकत असतात. औपचारीक शिक्षण व्यवस्थेने मुलांच्या या व अशा सर्व कृतींन प्रोत्साहन देऊन खतपाणी घालून फक्त दिशा द्यायची असते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये असेही म्हटले आहे की औपचारीक विषयांचे ज्ञान घेण्यांच्या बरोबरीने विवेकाने निर्णय घेण्याची क्षमता विकसीत करणे, संवेदनशिलता जागृत करणे, कामाचा अनुभव घेता येणे.कौशल्ये रुजविणे, कला प्रकारांचे रसग्रहन करता येणे, सर्जनशिलता वाढविणे ही देखील शिक्षणाची मुलभुत उद्दीष्टे आहेत. ही उद्दीष्टे साध्य होतील अशी साधन व अशा संधी शिक्षण व्यवस्थेने उपलब्ध करून दिल्या पाहिजे.

आधुनिक काळात विज्ञानाने प्रगती केली असली तरी समाजात वैज्ञानिक दृष्टी, विवेक, चिकित्सा, डोळस दृष्टी आदी बाबी सद्द्या रूजलेल्या नाहीत. समाज आणि साहित्याचा परस्पर संबंध आहे. साहित्यीक हा समाजाच्या बदलांचा सुचक वेध घेतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महाराजांचे साहित्य सुद्धा समाजोद्धाराच्या आत्यंतिक प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. आदर्श मानाव घडविण्यासाठी त्यांनी अनेक रचनात्मक उपक्रमांची पायाभरणी केली अशा उपक्रमाची आखणी करणे आवश्यक आहे.

विदर्भातील एक थोर संत, तत्वचिंतक व विचारवंत की ज्यांनी आपल्या साहित्यातुन समाज प्रबोधनचे विचार मांडले. प्रचार प्रसार करावा समाजामध्ये रुजवावे4. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महाराजांच्या तत्वज्ञानतील शैक्षणिक संकल्पनांचा शोध घेता येईल काय? यासाठी प्रोत्साहन देणे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महाराजांच्या तत्वज्ञानतील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने शैक्षणिक मुल्यांचा शोध घेता येईल काय? यासाठी प्रोत्साहन देणे.

## संदर्भ सूची.

पंडित बन्सी बिहारी (२०१०), शिक्षणातील संशोधन, पूणे, नित्यनूतन प्रकाशन.

पानझाडे श्रीराम व डामरे गोकुल (२०१६), शैक्षणिक आयोग आणि कार्यवाहीन्या, अमरावती, नभप्रकाशन.

कदम चा.प. (२००८), शैक्षणिक संख्या शास्त्र, पुणे, नित्य नुतन प्रकाशन.

खोब्रागडे हर्षानंद, डामरे गोकुल (२०१४), सुलभ शैक्षणिक संशोधन पद्धती, अमरावती, सुगम प्रकाशन.

भिंताडे वि.रा. (२००९) शैक्षणिक संशेधन पद्धती, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

कुंडले, म.बा. (१९८३) शैक्षणिक तंत्रज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (२०१८), ग्रामगीता, गुरुकुंज आश्रम, श्री गुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान.